**सोबत- सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी तसेच कार्यालयात येणा-या अभ्यागतांसाठी स्वच्छतेच्या सुविधा पुरविण्याबाबत शासनच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०१०/( २०८/१० ) समन्वय, दिनांक १२.११.२०१० ची सहपत्रांसह प्रत.**

---

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पोष्ट बॉक्स नं. २१९
सामनगांव रोड, नाशिक रोड ४२२ १०१

जा.क्र.तंशि/विकाना/आस्था/ 195
दिनांक :-
- 9 FEB 2011

प्रत: माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी
प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व
विनाअनुदानित पदवी/पदविका संस्था,
नाशिक विभाग.

२/- त्यांना कळविण्यात येते की, सोबतच्या शासन परिपत्रकाचे अवलोकन करुन शासन परिपत्रकाचे निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी. व सोबतच्या विवरणपत्रात माहिती भरुन प्रत्येक महिन्याच्या १ तारखेपर्यत या कार्यालयास सादर करावी. सदरची माहिती संचालनालया मार्फत शासनास सादर करावयाची असल्याने प्रथम प्राध्यान्याने माहिती तात्काळ या कार्यालयाला सादर करावी.

**(दि.रा.नंदनवार)**
**प्र.सहसंचालक,**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

E:\\endorsment.vgd.doc

**सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी तसेच कार्यालयात येणाऱ्या अभ्यागतांसाठी स्वच्छतेच्या सुविधा पुरविण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१०/(२०८/१०)/समन्वय,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १२ नोव्हेंबर,२०१०.

**प्रस्तावना :-** राज्यात पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या विभागा मार्फत राबविण्यात येत असलेल्या सुजल व निर्मल अभियानाअंतर्गत स्वच्छता सुविधांचे सार्वत्रिकीकरण करुन महाराष्ट्र राज्य निर्मल करण्यासाठी वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयांचा दर्जा वाढविणे, पर्याप्त शौचालयांचे बांधकाम करुन कार्यक्षम व्यवस्थापन करण्याच्या धोरणास मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने राज्यात स्वच्छता सेवांचे सार्वत्रिकीकरण करण्यासंदर्भात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दिनांक १९.६.२०१० च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांना दि. ११/१०/२०१० च्या अ.शा.पत्रान्वये महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त स्वच्छता सेवांचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या विविध शासकीय, विद्यापीठीय, महाविद्यालये, प्रशासकीय इमारती, निमशासकीय कार्यालयांमध्ये तसेच खाजगी महाविद्यालयांमध्येसुध्दा स्वच्छतेच्या पर्याप्त सेवा उपलब्ध असणे आवश्यक असल्याचे कळविले आहे.

**परिपत्रक :-** उपरोक्त प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत सर्व विद्यापीठे, शासकीय निमशासकीय तसेच खाजगी महाविद्यालये, तांत्रिक शाळा, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, प्रशासकीय इमारतींमध्ये महिला व पुरुष यांच्या साठी दर्जेदार स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्धता करण्यासाठी व व्यवस्थापनासाठी प्रत्येक वर्षी पर्याप्त आर्थक तरतूद व संनियंत्रण करण्याची दक्षता घेण्यात यावी. तसेच सर्व संचालकांनी आणि विद्यापीठच्या कुलगुरु यांनी सदर परिपत्रक त्यांच्या अखत्यारीतील शासकीय, विद्यापीठे, महाविद्यालये, प्रशासकीय इमारती, निम शासकीय कार्यालयांच्या निदर्शनास आणावे आणि संस्था/कार्यालयांचा एकत्रित मासिक अहवाल सोबतच्या विवरणपत्रानुसार प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( दि. धों. तिवरेकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक
मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक
सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व संचालक, (उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण / कला / ग्रंथालय)
सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु.
निवड नस्ती (समन्वय).

विवरणपत्र [शासन परिपत्रक क्रमांक- संकिर्ण/२०१०/(२०८/१०) [illegible] दि. १२/१[illegible]

| कार्यालयाचे नांव | कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांची अभ्यागतांची संख्या विचारात घेऊन कार्यालयात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निकषानुसार कार्यालयात आवश्यक असलेली स्वच्छतागृहे | | अस्तित्वात असलेली स्वच्छतागृहे | | उर्वरित स्वच्छतागृह | | संबंधित विभागाने त्यासाठी आर्थिक तरतूद केली आहे काय ? | स्वच्छतागृह बांधकामाची सद्यस्थिती (रकाना ५ पैकी) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | ४ | | ५ | ६ | | | |
| | | | | | | | | बांधलेले | | बांधावयाची शिल्लक | |
| | पुरुष | महिला | पुरुष | महिला | पुरुष | महिला | | पु. | म. | पु. | म. |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |